महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
(नगरपालिका शाखा)
दू.- (०२४१)२३४५६८० E-mail ID-daoahmednagar@gmail.com

**विषय: पारनेर नगरपंचायत, पारनेर**
**अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेबाबत**

**वाचा** :-

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९७/नवि-१६, दि.१२/०४/२०१६
२. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र.७५(क-९)/नवि-१६, दि.१९/०४/२०२२
३. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१८३/नवि-१६, दि.०६/०७/२०२२
४. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१८३/भाग-२(२)/नवि-१६, दि.२१/०७/२०२३
५. महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-१९९८/प्र.क्र.३०/नवि-०४, दि.२८/०४/२०२३
६. महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र.७५(क-९)/नवि-१६, दि.२७/०९/२०२३
७. Department of Civil Engineering COEP Technological University Ref.COEP/Consultancy/PCI/Road/ANP/MUK/१५३ Date-२७/१२/२०२३ PCI अहवाल
८. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील तांत्रिक मान्यता (Technical Approval)
९. पारनेर नगरपंचायत, पारनेर सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४/२, दि.२७/०९/२०२३
१०. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील पत्र जा.क्रं.:-प्रशा/१०२३०/सन २०२३, दि.१५/१२/२०२३

---

ज्याअर्थी, शासनाच्या "नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" योजनेअंतर्गत पारनेर नगरपंचायतीस सन २०२१-२०२२ करिता पुढीलप्रमाणे अनुदान मंजूर झाले आहे.

**महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र.७५(क-९)/ नवि-१६, दि.२७/०९/२०२३**

पारनेर नगरपंचायत क्षेत्रातील कामे

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.०३ अर्जून ठुबे घर ते जामगाव रोड रस्ता करणे. | रु.५०,००,०००/- |
| २ | प्रभाग क्र.7 मनकर्णिका नदीवर पुल व मनकर्णिका विहिर सुशोभीकरण करणे. | रु.४०,००,०००/- |
| ३ | प्रभाग क्र.०६ मधील अळकुटी रोड ते तिरकळ मळा रस्ता काँक्रिटीकरण करणे. | रु.२०,००,०००/- |
| | **एकूण** | **रु.१,१०,००,०००/-** |

ज्याअर्थी, उपरोक्त नमूद शासन निर्णयास महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१८३/नवि-१६, दि.०६/०७/२०२२ अन्वये स्थगिती देण्यात आली होती. तथापि, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२२/प्र.क्र.१८३/भाग-२(२)/नवि-१६, दि.२१/०७/२०२३ अन्वये सदर शासन निर्णयास असलेली स्थगिती उठविणेत आलेली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त मंजूर अनुदानातून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी पुढीलप्रमाणे प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

**प्रस्तावाचा तपशील:**

| अ. क्र. | शा.नि. अ.क्र. | कामाचे नाव | शासन निर्णय दि.१९/०४/२०२२ अन्वये मंजूर अनुदान | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | १ | प्रभाग क्र.०३ अर्जून ठुबे घर ते जामगाव रोड रस्ता करणे. | रु.५०,००,०००/- | रु.५०,००,०००/- |
| २ | २ | प्रभाग क्र.7 मनकर्णिका नदीवर पुल व मनकर्णिका विहिर सुशोभीकरण करणे. | रु.४०,००,०००/- | रु.४०,००,०००/- |
| ३ | ३ | प्रभाग क्र.०६ मधील अळकुटी रोड ते तिरकळ मळा रस्ता काँक्रिटीकरण करणे. | रु.२०,००,०००/- | रु.२०,००,०००/- |
| | | **एकूण** | **रु.१,१०,००,०००/-** | **रु.१,१०,००,०००/-** |

ज्याअर्थी, उपरोक्त प्रस्तावित कामांस पारनेर नगरपंचायत, पारनेर सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४/२, दि.२७/०९/२०२३ अन्वये मंजुरी प्रदान केलेली असून कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेकडील तांत्रिक मान्यता (Technical Approval) घेतलेले आहे.

त्याअर्थी, मी जिल्हाधिकारी अहमदनगर, मला महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९७/नवि-१६, दि.१२/०४/२०१६; तसेच, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र.७५(क-९)/नवि-१६, दि.१९/०४/२०२२ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन पारनेर नगरपंचायतीस उपरोक्तप्रमाणे प्रस्तावित एकूण ३ कामांस **रु.१,१०,००,०००/-( अक्षरी रक्कम रुपये - एक कोटी दहा लक्ष रु.मात्र** इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता खालील अटी व शर्तीवर प्रदान करीत आहे.

**अटी व शर्ती:**

१) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९७/नवि-१६, दि.१२/०४/२०१६; महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र.७५(क-९)/नवि-१६, दि.१९/०४/२०२२; महाराष्ट्र शासन,नगर विकास विभाग,शासन शुध्दीपत्रक क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र.७५(क-९)/नवि-१६, दि.२७/०९/२०२३ मध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

२) प्राप्त अनुदानापेक्षा जास्त होणारा खर्च नगरपरिषद निधीतून करणेत यावा.

३) सदर निधीचा विनियोग शासनाने विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार होत आहे हे पाहण्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची असेल. याबाबत कोणतीही अनियमितता झाल्यास कार्यकारी अभियंता यांना जबाबदार धरणेत येईल व त्यांचेविरुद्ध शिस्तभंगाची कार्यवाही प्रस्तावित करणेत येईल.

४) सदर प्रशासकीय मान्यतेच्या रकमेतून सदर आदेशाच्या दिनांकापूर्वीची देयके अदा करण्यात येऊ नयेत.

५) प्रस्तावित कामाची अंमलबजावणी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदी व संचालनालयाकडील स्थायी निदेशातील सूचनांप्रमाणे करावी. कामगार विषयक सर्व कायदे व नियमांची अंमलबजावणी ठेकेदार यांना करणेबाबत अटी/ शर्ती करारपत्र व कामाच्या आदेशामध्ये नमूद करण्यात याव्यात.

६) सदर प्रस्तावास कार्यकारी अभियंता यांनी सादर केलेल्या माहितीच्या/ कागदपत्राचे आधारे प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. भविष्यात काही अडचण उद्धवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील.
७) सदर निधीचे विनियोग प्रमाणपत्र दर तीन महिन्यांनी विहीत नमुन्यात नपा प्रशासन संचालनालयास सादर करावे व त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.
८) या योजनेअंतर्गत हाती घ्यावयाच्या कामाबाबत जागेची मालकी हक्क व इ. बाबत काही तक्रारी/ वाद निर्माण झाल्यास त्याची पुर्ण जबाबदारी सर्वाजनिक बांधकाम विभाग यांची राहील.
९) प्रस्तावित कामाचे सक्षम प्राधिकारी यांचेकडून कामाची गुणवत्ता तपासणी करणे बंधनकारक राहील.
१०) शासन निर्णय दि.२८/०३/२०१८ नुसार कामाचे तांत्रिक लेखापरिक्षण करुन घेणे बंधनकारक राहील.
११) नगरविकास विभागाकडील शासन परिपत्रक क्र. संकिर्ण-२०१९/प्र.क्र.४९/नवि-०४, दि.२० मे २०१९ मधील सूचनांनुसार कार्यवाही करुनच ठेकेदाराची देयके अदा करणेची जबाबदारी संबंधित खातेप्रमुख व कार्यकारी अभियंता यांची राहील.
१२) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता, २०१३ मधील तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
१३) आदेशात नमूद रक्कम अंदाजित असून प्रत्यक्षात दिलेले काम त्याची मोजमाप पुस्तिकेत केलेल्या नोंदी, स्वच्छता निरीक्षक यांचे अहवाल, नगरपरिषद स्तरावरील गणितीय तपासणी अंतीची रक्कम ढोबळ रक्कम देय राहील व देयबिलाच्या ढोबळ रकमेतून नियमानुसार आयकर, जीएसटी, शासकीय विमा यासारख्या शासनास देय असलेने करांची कपात करुन शासनाकडे भरणा करावा.
१४) ठेकेदाराचे काम अपूर्ण/ असमाधानकारक असलेस करारनाम्यानुसार दंड/ कपाती कराव्यात.
१५) सदर निधीमधून अन्य कोणत्याही कामांसाठी खर्च करणे अनुज्ञेय राहणार नाही.
१६) सदर कामाच्या निविदा शासनाच्या नियमानुसार ई- निविदाद्वारे मागविण्यात याव्यात.
१७) सदर कामाची तपासणी त्रयस्थ शासकीय मान्यताप्राप्त संस्थेकडून करुन घ्यावी.
१८) किमान वेतन कायदा, कामगार कायद्यामधील तरतुदींचे पालन होत असलेबाबत कार्यकारी अभियंता यांनी खात्री करावी. सदर कायद्याचा भंग होणार नाही याद्दष्टीने उपाययोजना कराव्यात.
१९) स्थानिक निधी लेखा विभागाकडून देयकाची तपासणी करावी व लेखा परिक्षणातील आक्षेपांची पूर्तता करावी.
२०) सदर प्रस्तावित कामांची ई- निविदा व कार्यारंभ आदेश याबाबतची कार्यवाही निधी प्राप्त झालेनंतर करणेत यावी.
२१) सदर प्रशासकीय मान्यता ही सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे देणेत येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी पुरविलेली माहिती चुकीची आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभाग यांची राहील.
२२) प्रस्तावित कामांस सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मंजुरी (Technical Sanction) घेणेची जबाबदारी कार्यकारी अभियंता यांची राहील.

Signed by
Sidharam Karbasayya Salimath
Date: 25-01-2024 13:48:59

**सिद्धाराम सालीमठ, भा.प्र.से.,**
**जिल्हाधिकारी अहमदनगर**

**प्रति:** मुख्याधिकारी, पारनेर नगरपंचायत, पारनेर यांचेकडे आवश्यक कार्यवाहीसाठी
**प्रत:** मा. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई- ४०० ६१४
**प्रत:** मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक (नगरपालिका शाखा)